**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम**
**नैसर्गिक परिस्थितीमुळे दूरवरुन पाणी आणावे लागल्याने होणाऱ्या देखभाल दुरुस्ती खर्चाची काही प्रमाणात प्रतिपूर्ती करण्यासाठी गरजू ग्राम पंचायतींना व जिल्हा परिषदांना देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक ग्रापापु १००३/प्रक्र २५६/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक १० जुलै, २००६**

वाचा :-

(१) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि. क्रमांक ग्रापापु १०९९/प्र.क्र.३२८/पापु-०७ दिनांक २७.७.२०००
(२) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि. क्रमांक ग्रापापु १००३/प्र.क्र.४/पापु-०७ दिनांक ७.२.२००३

**प्रस्तावना :**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम, मागणी आधारित पुरवठा आणि लोकसहभागाच्या तत्वावर राबविण्यात येत आहे. यानुसार योजनेची **निवड, आखणी व अंमलबजावणी** ही संबंधित गावच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत करावयाची आहे. तर, योजनेच्या देखभाल व दुरुस्तीवरील १००% खर्च संबंधित लाभार्थ्यांनी करावयाचा आहे. शासन यंत्रणेचा यामधील सहभाग हा **सहाय्यकर्त्याचा** राहणार आहे. ही सहाय्यकर्त्याची भूमिका शासनाव्दारे, जिल्हा परिषदेमार्फत राबवावी असे धोरण ठरविण्यात आले आहे.

२. १००% देखभाल दुरुस्ती ग्रामस्थांनीच स्वखर्चाने करावी व त्यासाठी त्यांनी पाणीपट्टीव्दारे निधी उपलब्ध करुन घ्यावा यासाठी शासन अधिसूचना, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, दिनांक १७ जानेवारी, २००२ अन्वये पाणीपट्टी वरील कमाल मर्यादा काढून टाकण्यात आली आहे. मात्र, पाणीपट्टीची योग्य आकारणी व वसूली करुन १००% देखभाल दुरुस्ती ग्रामस्थांनी करावी, या धोरणाची अंमलबजावणी करतानाच ज्या गावांना स्वच्छ पाणी नैसर्गिक परिस्थितीमुळे दुरुन आणावे लागते अशा गावांना पारदर्शक निकष ठरवून काही प्रमाणात अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

३. तसेच, प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे बाबतीतही जिल्हयातील परिस्थिती विचारात घेवून, एक समान पूल दर ठरवून, अशा पूल दरामूळे जिल्हयातील ज्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांना त्यांच्या खर्चासाठी आवश्यक दरापेक्षा जादा द्याव्या लागणाऱ्या दराकरीता काही प्रमाणात अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून संदर्भिय क्रमांक १ येथील दिनांक २७ जुलै,२००० च्या शासन निर्णयानुसार किमान गरजा कार्यक्रमाखाली ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी राखून ठेवण्यात येणाऱ्या १५% निधीपैकी, संदर्भिय क्रमांक २ येथील दिनांक ७.२.२००३ च्या शासन निर्णयान्वये दरवर्षी टप्याटप्याने कमी करण्यात आल्यामुळे शिल्लक राहीलेला निधी व राज्याला इतर सर्व माध्यमातून ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरूस्तीसाठी प्राप्त होणारा -निधी ( उदा. केंद्र शासनाच्या वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमामधून देखभाल व दुरूस्तीसाठी दरवर्षी प्राप्त होणारा निधी ) पुढील परिच्छेदात नमूद केल्यानुसार स्वतंत्र ग्राम पंचायतीच्या पाणी पुरवठा योजनांसाठी गरजू ग्राम पंचायतींना, प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांसाठी जिल्हा परिषदांना व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास **देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान** देण्यास शासन मान्यता देत आहे.

२. ज्या गावांना स्वच्छ पाणी नैसर्गिक परिस्थितीमुळे दुरुन पाणी आणावे लागते अशा गावांच्या पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी पुरेसा निधी उपलब्ध व्हावा या करिता ज्या ग्राम पंचायती **परिशिष्ट-१** मधील अटी व शर्ती पूर्ण करतील त्या ग्राम पंचायतीस **परिशिष्ट-२ मध्ये** दिलेल्या सुत्रानुसार **देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान** देण्यास शासन मान्यता देत आहे.

३. तसेच, प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे बाबतीतही सर्व जिल्हयातील परिस्थिती विचारात घेवून एक समान पूल दर ठरवून अशा पूल दरामूळे जिल्हयातील ज्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांना त्यांच्या खर्चासाठी आवश्यक दरापेक्षा जादा द्याव्या लागणाऱ्या दराकरीता, ज्या जिल्हा परिषदा **परिशिष्ट - ३** मधील अटी व शर्ती पूर्ण करतील त्या जिल्हा परिषदांना **परिशिष्ट-४ मध्ये** दिलेल्या सुत्रा नुसार **देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान** देण्यास शासन मान्यता देत आहे.

४. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत ज्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरूस्ती केली जाते त्या योजनेसाठी देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान प्राप्त होण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने संबंधित जिल्हा परिषदेकडे मागणी करावी. परंतु, त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास **परिशिष्ट - ३** मधील अटी व शर्ती मान्य कराव्या लागतील. जिल्हा परिषदांनी जिल्हयातील प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांसाठी प्राप्त देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदानापैकी परिशिष्ट-५ मधील सुत्रानुसार अनुज्ञेय अनुदान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उपलब्ध करून द्यावे.

५. वरील परिच्छेद १ मध्ये नमूद केल्यानुसार राज्यास उपलब्ध होणाऱ्या **एकूण निधी पैकी ५०% निधी ग्राम पंचायतीना व ५०% निधी जिल्हा परिषदांना** वरील परिच्छेद २, ३ व ४ नुसार देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान देण्यासाठी राखून ठेवण्यात येत आहे. उपलब्ध निधी वरील प्रमाणे राखून ठेवला असला तरी या प्रमाणात बदल करण्याचे अधिकार शासनास राहतील.

६. नैसर्गिक परिस्थितीमुळे दुरुन म्हणजे सपाट भूपृष्ठाकरिता गावठाणापासून १.६ कि.मी. पेक्षा अधिक दुरुन अथवा डोंगराळभागा करिता १०० मीटर्स पेक्षा जास्त उंचीवर पाणी आणावे लागत असलेल्या जिल्हयातील सर्व ग्राम पंचायतींची माहिती सर्व जिल्हयांनी या विभागाकडे **दिनांक १४ ऑगस्ट, २००६ पर्यंत** पाठवावी. या माहितीमध्ये काही बदल झाल्यास ती माहीती दरवर्षी **एप्रिल ते जून** या कालावधीत पाठविण्यात यावी.

७. तसेच, जिल्हयातील एकूण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना, त्यामध्ये समाविष्ट लोकसंख्या (सन २००१ च्या जनगणने नुसार) व या योजनांवर आकारलेली पाणीपट्टी, पाणीपट्टीची मागणी व वसूली याबाबतची माहिती सर्व जिल्हयांनी या विभागाकडे **दिनांक १४ ऑगस्ट, २००६ पर्यंत** पाठवावी. तसेच, या माहितीमध्ये काही बदल झाल्यास ती माहीती दरवर्षी **एप्रिल ते जून** या कालावधीत पाठविण्यात यावी.

८. हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रं. ३२७/०६/व्यय ३, दिनांक १३ जून, २००६ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००६०७१०१२०३५७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

संजीव कुमार

**(संजीव कुमार)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,
मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. अध्यक्ष , जिल्हा परिषद, (सर्व)
मा. मुख्य सचिव

विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
प्रकल्प व्यवस्थापक, जलस्वराज्य प्रकल्प, सुधारणा सहाय व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, बेलापूर
प्रकल्प अधिकारी, आपलं पाणी प्रकल्प, सुधारणा सहाय व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, बेलापूर
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
तहसीलदार (सर्व)
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद, (सर्व)
गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग
संगणक कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

## परिशिष्ट - १

गावाच्या **नैसर्गिक परिस्थितीमुळे दुरून पाणी आणावे लागत असलेल्या (सपाट भूपृष्ठाकरिता गावठाणापासून १.६ कि.मी. पेक्षा अधिक दुरून अथवा डोंगराळ भागाकरिता १०० मीटर्स पेक्षा जास्त उंचीवर पाणी आणावे लागत असलेल्या)** स्वतंत्र ग्रामपंचायती **देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान** मिळण्यासाठी पात्र आहेत. हे अनुदान प्राप्त करून घेण्यासाठी **खाली नमूद केलेली पात्रता धारण करणाऱ्या** गावाने संबंधित जिल्हा परिषदेकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

**अनूदान प्राप्त होण्यासठी पात्रता व पूर्ण करावयाच्या अटी :**

(१) नैसर्गिक परिस्थितीमुळे दुरून म्हणजे **सपाट भूपृष्ठाकरिता गावठाणापासून १.६ कि.मी. पेक्षा अधिक दुरून अथवा डोंगराळ भागाकरिता १०० मीटर्स पेक्षा जास्त उंचीवर पाणी आणावे लागत असावे.**

(२) गावची स्वतंत्र पाणी पुरवठा योजना असावी व कोणत्याही प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचा लाभ ते गाव घेत नसावे.

(३) संबंधित योजना गावाने हस्तांतरीत करून घेतली असावी व मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ च्या सुधारित कलम ४९ नुसार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती गठित करून योजनेची देखभाल व दुरूस्ती या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत करण्यात येत असावी.

(४) शासन अधिसूचना, दिनांक २२.९.१९९७ नुसार ग्रामस्तरावर ग्राम पाणी पुरवठा निधीचे स्वतंत्र बँक खाते उघडून त्यामध्ये नियमानुसार रकमा जमा करण्यात येत असाव्यात.

(५) अनुदान मागणी करतानाच्या लगतच्या वर्षात योजनेच्या लाभार्थ्यावर शासनाने ठरवून दिलेल्या **किमान अथवा त्यापेक्षा अधिक दराने पाणीपट्टी** आकारण्यात येत असावी.

(६) वरीलप्रमाणे आकारलेल्या पाणीपट्टीची **किमान ५०% वसूली** अनुदान मागणी करतानाच्या लगतच्या वर्षात करण्यात आली असावी.

(७) योजनेच्या पाणीपट्टीच्या दरात दरवर्षी वाढ करून व पाणीपट्टीची वसूली वाढवून, पाणीपट्टीची आकारणी व वसूली पुढील पाच वर्षात योजनेच्या देखभाल व दुरूस्तीच्या खर्चाच्या प्रमाणात करण्याबाबत ग्रामसभेचा ठराव केलेला असावा.

(८) पहिल्या वर्षी म्हणजे सन २००६-२००७ मध्ये वरील (५) व (६) मधील निकषानुसार संबंधित ग्रामपंचायत **देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान** मिळण्यासाठी पात्र ठरेल. परंतु, त्यापुढील वर्षापासून म्हणजे सन २००७-२००८ पासून वरील (७) येथील ग्रामसभेच्या ठरावानुसार दरवर्षी करावयाची कार्यवाही झाल्यानंतरच संबंधित ग्राम पंचायत **देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदानासाठी** पात्र होईल.

## परिशिष्ट - २

### स्वतंत्र योजनांसाठी ग्राम पंचायतींना द्यावयाच्या देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान वाटपाचे सुत्र

अनुदान उपलब्धतेसाठी जिल्हयासाठी वेटेज

| | | | |
|---|---|---|---|
| अ = | जिल्हयातील स्वतंत्र योजनेत समाविष्ट लोकसंख्या (सन २००१ च्या जनगणने नुसार) | १०० % | जिल्हयातील अनुदानासाठी पात्र स्वतंत्र ग्रामपंचायतीच्या योजनेत समाविष्ट लोकसंख्या / राज्यातील अनुदानासाठी पात्र स्वतंत्र ग्रामपंचायतीच्या योजनेत समाविष्ट लोकसंख्या |

ब = स्वतंत्र योजनांसाठी ग्राम पंचायतींना द्यावयासाठी राज्यास एकूण उपलब्ध देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान

क = जिल्हा परिषदेस उपलब्ध होणारा हिस्सा

क = (ब X अ)

अनुदान वाटपासाठी गावांना वेटेज

| | | | |
|---|---|---|---|
| अ = | स्वतंत्र ग्रामपंचायतीच्या योजनेत समाविष्ट लोकसंख्या (सन २००१ च्या जनगणने नुसार) | ५० % | अनुदानासाठी पात्र स्वतंत्र ग्राम पंचायतीच्या योजनेत समाविष्ट लोकसंख्या / जिल्हयातील अनुदानासाठी पात्र स्वतंत्र ग्राम पंचायतीच्या योजनेत समाविष्ट लोकसंख्या |
| ब = | पाणीपट्टी वसूली | ५०% | अनुदानासाठी पात्र स्वतंत्र ग्राम पंचायतीच्या योजनेची मागील आर्थिक वर्षातील पाणीपट्टी वसूलीची रक्कम / जिल्हयातील अनुदानासाठी पात्र स्वतंत्र ग्राम पंचायतीच्या योजनेची मागील आर्थिक वर्षातील पाणीपट्टी वसूलीची रक्कम |

क = स्वतंत्र योजनांसाठी ग्राम पंचायतींना द्यावयासाठी जिल्हयास एकूण उपलब्ध देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान

ड = गावाचा उपलब्ध होणारा हिस्सा

$$ड = \frac{क}{२} \times (अ + ब)$$

## परिशिष्ट - ३

प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांसाठी देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान प्राप्त होण्यासाठी खालील पात्रता धारण करणाऱ्या जिल्हा परिषदेने शासनाकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

अनूदान प्राप्त होण्यासठी पात्रता व **पूर्ण करावयाच्या अटी :**

(अ) प्राथमिक पात्रता

(१) अनुदान मागणी करतानाच्या लगतच्या वर्षात जिल्हयातील सर्व प्रादेशिक योजने अंतर्गत येणाऱ्या लाभार्थ्यांवर शासनाने ठरवून दिलेल्या **किमान अथवा त्यापेक्षा अधिक दराने पाणीपट्टी** आकारण्यात येत असावी. (जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत चालविण्यात येत असलेल्या योजनांसह जिल्हयातील सर्व पाणी पुरवठा योजनाचा समावेश असावा.)

(२) अनुदान मागणी करतानाच्या लगतच्या वर्षात वरील प्रमाणे आकारलेल्या पाणीपट्टीची **किमान ५०% वसूली** करण्यात आली असावी.

(३) जिल्हयातील प्रादेशिक योजनांमधील लाभार्थ्यांवर पाणीपट्टी आकारून या पाणीपट्टीच्या दरात दरवर्षी वाढ करून व पाणीपट्टीची वसूली वाढवून, पाणीपट्टीची आकारणी व वसूली पुढील पाच वर्षात योजनेच्या देखभाल व दुरूस्तीच्या खर्चाच्या प्रमाणात करण्याची तयारी असल्याबाबतचा ठराव जिल्हा परिषदेने / महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने किंवा संबंधित संस्थने करून घेणे आवश्यक आहे.

(४) पहिल्या वर्षी म्हणजे सन २००६-२००७ मध्ये वरील (१) व (२) मधील निकषानुसार संबंधित जिल्हा परिषद/ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण **देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान** मिळण्यासाठी पात्र ठरेल. परंतु, त्यापुढील वर्षापासून म्हणजे सन २००७-२००८ पासून वरील (३) येथील जिल्हा परिषदेच्या/ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ठरावानुसार दरवर्षी करावयाची कार्यवाही झाल्यानंतरच संबंधित जिल्हा परिषद **देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदानासाठी** पात्र होईल.

(५) शासन अधिसूचना, दिनांक २२.९.१९८६ नुसार जिल्हा परिषदेमध्ये स्वतंत्र **जिल्हा देखभाल व दुरूस्ती निधी** गठीत करून त्यामध्ये नियमानुसार रकमा जमा करण्यात येत असाव्यात व यापुढेही त्या रकमा जमा करण्यात याव्यात. (फक्त जिल्हा परिषदांसाठी)

## परिशिष्ट -४

### प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांसाठी जिल्हा परिषदांना द्यावयाच्या देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनूदानाच्या वाटपाचे सुत्र

अनुदान वाटपासाठी जिल्हयांना वेटेज

| | | | |
|---|---|---|---|
| अ = | जिल्हयातील प्रादेशिक योजनेत समाविष्ट लोकसंख्या (सन २००१ च्या जनगणने नुसार) | ५० % | जिल्हयातील अनूदानासाठी पात्र प्रादेशिक योजनेत समाविष्ट लोकसंख्या / राज्यातील अनूदानासाठी पात्र प्रादेशिक योजनेत समाविष्ट लोकसंख्या |
| ब = | पाणीपट्टी वसूली | ५०% | जिल्हयातील अनूदानासाठी पात्र प्रादेशिक योजनांची मागील आर्थिक वर्षातील पाणीपट्टी वसूलीची रक्कम / राज्यातील अनूदानासाठी पात्र प्रादेशिक योजनांची मागील आर्थिक वर्षातील पाणीपट्टी वसूलीची रक्कम |

क = प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांसाठी राज्यास एकूण उपलब्ध देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान

इ = जिल्हा परिषदेस उपलब्ध होणारा हिस्सा

$$इ = \frac{क}{२} \times (अ + ब)$$

---

## परिशिष्ट - ५

### प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास द्यावयाच्या देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनूदानाच्या वाटपाचे सुत्र

| | | | |
|---|---|---|---|
| अ = | जिल्हयातील प्रादेशिक योजनेत समाविष्ट लोकसंख्या (सन २००१ च्या जनगणने नुसार) | ५० % | म.जी.प्रा.कडील अनूदानासाठी पात्र प्रादेशिक योजनेत समाविष्ट लोकसंख्या / जिल्हयातील अनूदानासाठी पात्र प्रादेशिक योजनेत समाविष्ट लोकसंख्या |
| ब = | पाणीपट्टी वसूली | ५०% | म.जी.प्रा.कडील अनूदानासाठी पात्र प्रादेशिक योजनांची मागील आर्थिक वर्षातील पाणीपट्टी वसूलीची रक्कम / जिल्हयातील अनूदानासाठी पात्र प्रादेशिक योजनांची मागील आर्थिक वर्षातील पाणीपट्टी वसूलीची रक्कम |

क = प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांसाठी जिल्हयास एकूण उपलब्ध देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान

फ = महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उपलब्ध होणारा हिस्सा

$$फ = \frac{क}{२} \times (अ + ब)$$

---